# <u>रे.दिवाणी दावा क्र.१४८/२०१५ नि.२८ वरील आदेश</u>
(CNR No.MHOS10-000313-2015)

१. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ०१ नियम १० व आदेशिका ०६ नियम १७ अन्वये वाढीव प्रतिवादीचे नावे समाविष्ट करुन त्यानुसार दावा दुरुस्त करण्याकरिता दाखल केला आहे. वादीने सदरचा दावा तो दावामिळकतीचा मालक आहे असे जाहीर करुन दाव्यासोबतच्या नकाशात लाल रंगाने दाखविलेले अंदाजे १५ आर क्षेत्राचा ताबा त्याला प्रतिवादींकडुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जामध्ये असे कथन आहे की, प्रस्तुत प्रकरणातील वादीतील जमीनीची उप अधिक्षक भुमी अभिलेख, वाशी यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक करुन मोजणी करणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणुन पारगाव, ता.वाशी येथील भुमापन क्र.१००/अ, १००/ब, १००/क, १०१/अ आणि १०१/ब मधील सर्व खातेदारांना सदर दाव्यामध्ये औपचारीक पक्षकार म्हणुन समाविष्ट करणे आवश्यक आहे.

३. प्रतिवादींतर्फे अर्जावर म्हणणे दाखल नाही.

४. वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा दावा हा वादी दावामिळकतीचा मालक आहे असे जाहीर करुन दाव्यासोबतच्या नकाशात लाल रंगाने दाखविलेले अंदाजे १५ आर क्षेत्राचा ताबा त्याला प्रतिवादींकडुन मिळण्यासाठीचा आहे. सदर प्रकरणामध्ये मुददे् काढण्यात आलेले आहे. त्यानंतर वादीने सदरचा दुरुस्तीचा अर्ज सादर केला आहे. त्यामुळे प्रतिवादींना गैरसोयीचे ठरणार आहे. परंतु, सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच, प्रतिवादींना देखील सदर दुरुस्तीच्या अनुषंगाने पुरावा देण्याची संधी मिळणार असल्याने त्यांचे देखील कोणतेही नुकसान होणार नाही व दावामिळकतीच्या अनुषंगाने संबंधित दोनही पक्षकारांमधील संपुर्ण वादाचे निराकरण होणार आहे.

५. सबब, वर नमुद सर्व कारणांस्तव वादीचा सदरचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित ठरणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अ. वादीचा अर्ज (नि.२८) मंजुर करण्यात येत आहे.

ब. वादीने या अर्जाच्या आदेशाच्या तारखेपासुन १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्त करुन दाव्याची दुरुस्ती प्रत त्याच्या प्रतींसह न्यायालयात दाखल करावी.

सही/—

( एस.एम.कोळेकर )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
वाशी, ता.वाशी.

दि.०५.०८.२०१९